# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**[गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक १ व २)] :-**

(१) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर आपत्ती व्यवस्थापन मंत्री निवेदन करतील :-**

शहानूर नदीच्या काठावरील मौजे विहिगांव, जि.अमरावती येथील घरांना पुराच्या व भुस्खलनाच्या धोक्यापासून संरक्षण देणेबाबत.

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर मराठी भाषा मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारने मराठी भाषेला दिलेला "अभिजात दर्जा" कागदावर असल्याबाबत.

(३) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर वने मंत्री निवेदन करतील :-**

ट्रांजिट ट्रीटमेन्ट सेंटर, बचाव पथक यांना लागणाऱ्या साहित्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

(४) **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

NCERT च्या पाठ्यपुस्तकातून 'मराठा साम्राज्याचा नकाशा' वगळल्याबाबत.

(५) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १९ वर कृषी मंत्री निवेदन करतील :-**

रोटा/एचबी-१२४७ (१,८००-०३-२०२६)

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील कांदा व मका उत्पादक शेतकऱ्यांनी चांदवड कृषि उत्पन्न बाजार समिती येथे आमरण उपोषण सुरु केल्याबाबत.

(६) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १७ वर कामगार मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारच्या कामगार व शेतकरी धोरणाविरोधात राज्यातील कामगारांनी राज्यव्यापी संप केल्याबाबत.

(७) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

वर्धा जिल्ह्यातील सिंदी (रेल्वे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत.

**तीन : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**चार शासकीय विधेयके –**

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

## (दुपारी २-०० वाजता)

**पाच : मुख्यमंत्री सन २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन :**<br>मुंबई,<br>दिनांक : ५ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**<br>सचिव-३,<br>महाराष्ट्र विधानपरिषद.